# अनुभवा ‘खुमासदार अत्रे’

▶▶ पुणे टाइम्स टीम



कविता, कथा, विडंबन, विनोदी लेखन, नाटक, सिनेमा, पत्रकारिता, शिक्षण, व्याख्यान, राजकारण अशा विविध क्षेत्रांत लीलया मुशाफिरी करणारं नाव म्हणजे प्र. के. अत्रे. अत्रेंच्या विविधरंगी व्यक्तिमत्त्वाचा अनुभव घेण्याची संधी रसिकांना त्यांच्या जन्मदिनी गुरुवारी (दि. १३) मिळणार आहे. अत्रे यांच्या जयंतीनिमित्त श्याम भुर्के ‘खुमासदार अत्रे’ हा कार्यक्रम सादर करणार आहेत. बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना इथं संध्याकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.